Indian Streams Research Journal
Vol -1 , ISSUE –1, Feb - 2011
ISSN:- 2230-7850 Available online at www.lbp.world

# महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या–एक भिषण वास्तव

**प्रा. किशोर बुटले**
मराठी विभाग प्रमुख, अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ.

**प्रस्तावना :–**

निसर्गाची अवकृपा, शेतमालाला भाव न मिळाल्याने येणारे सुलतानी संकट अशा कचाट्यात अडकून कर्जाच्या ओझ्याखाली पिचल्यानेच शेतकरी आत्महत्या करत आहेत.संपूर्ण देशात महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होत असल्याची बाब समोर आली. गेल्या तीन वर्षांत राज्यातील एक हजार १५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब उघड झाली. इतर राज्यांच्या तुलनेत आत्महत्यांची ही संख्या सर्वाधिक आहे. राज्य व केंद्रात कृषी धोरण राबविणाऱ्यांसाठी ही चिंतनीय बाब आहे. गेल्या तीन वर्षांच्या आकडेवारीच्या तुलनेत शेतकरी आत्महत्येच्या संख्येत घट होत असल्याची दिलासा तेवढा समाधानकारक समजला जात आहे.

**विदर्भातील स्थिती :–**

विदर्भात अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, अमरावती आणि वर्धा हे सहा जिल्हे शेतकरी आत्महत्याग्रस्त म्हणून ओळखले जातात. या भागातील शेतकरी आत्महत्या थांबव्यात यासाठी केंद्र व राज्य सरकारने पॅकेज घोषित केले होते. या पॅकेजनंतर या भागातील शेतकरी आत्महत्या थांबतील, असा विश्वास राजकीय व सरकारी यंत्रणेला होता. पण, या भागातील तसेच राज्यातील इतर ही ठिकाणी शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबले नसल्याचे सरकारी आकडेवारीवरुन स्पष्ट होते. शेती संबंधीत विविध कारणांवरुन या आत्महत्या झाल्या आहेत. यात काही भागातील ओला व कोरडा दुष्काळ, शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपणा, कृषी उत्पादनास योग्य भाव न मिळणे अशा कारणांचा समावेश होतो. पण, काही वेळेस घरगुती कारणे, बिकट आर्थिक परिस्थिती या कारणांनी देखील आत्महत्या होताना दिसतात.

गेल्या तीन वर्षांत राज्यातील १ हजार १५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. संपुर्ण देशात ही संख्या सर्वाधिक असून महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यासाठी ही अत्यंत बाब लाजिरवाणी आहे. राज्य व केंद्रात शेती विषयक धोरण ठरविणाऱ्या राजकीय आणि त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय यंत्रणांचे अपयश यातून अधोरेखित होते. राज्यात सन २०१० मध्ये ५४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यानंतर सन २०११ मध्ये सुमारे ४८५ तर यंदा ११८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब समोर आली. गेल्या तीन वर्षांत शेजारच्या आंध्र प्रदेशात सुमारे ४३१ शेतकऱ्यांनी तर कर्नाटकात गेल्या तीन वर्षांत १६२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतकरी आत्महत्यांच्या दृष्टचक्रात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या तीन राज्यांना सर्वाधिक फटका बसत असून महाराष्ट्र यात क्रमांक एकचे राज्य झाले आहे. शेतीसोबत जोडधंदा उभा करण्यासाठी या भागातील केवळ गरजू शेतकऱ्यांना मदत व प्रोत्साहित करण्याच्या योजना राबविणे आता अनिवार्य झाले आहे.संपूर्ण देशात महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होत असल्याची बाब समोर आली. गेल्या तीन वर्षांत राज्यातील एक हजार १५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब उघड झाली. इतर राज्यांच्या तुलनेत

आत्महत्यांची ही संख्या सर्वाधिक आहे. राज्य व केंद्रात कृषी धोरण राबविणाऱ्यांसाठी ही चिंतनीय बाब आहे. गेल्या तीन वर्षांच्या आकडेवारीच्या तुलनेत शेतकरी आत्महत्येच्या संख्येत घट होत असल्याची दिलासा तेवढा समाधानकारक समजला जात आहे. विदर्भात अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, अमरावती आणि वर्धा हे सहा जिल्हे शेतकरी आत्महत्याग्रस्त म्हणून ओळखले जातात. या भागातील शेतकरी आत्महत्या थांबव्यात यासाठी केंद्र व राज्य सरकारने पॅकेज घोषित केले होते. या पॅकेजनंतर या भागातील शेतकरी आत्महत्या थांबतील, असा विश्वास राजकीय व सरकारी यंत्रणेला होता. पण, या भागातील तसेच राज्यातील इतर ही ठिकाणी शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबले नसल्याचे सरकारी आकडेवारीवरुन स्पष्ट होते. शेती संबंधीत विविध कारणांवरुन या आत्महत्या झाल्या आहेत. यात काही भागातील ओला व कोरडा दुष्काळ, शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपणा, कृषी उत्पादनास योग्य भाव न मिळणे अशा कारणांचा समावेश होतो. पण, काही वेळेस घरगुती कारणे, बिकट आर्थिक परिस्थिती या कारणांनी देखील आत्महत्या होताना दिसतात. गेल्या तीन वर्षांत राज्यातील १ हजार १५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. संपुर्ण देशात ही संख्या सर्वाधिक असून महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यासाठी ही अत्यंत बाब लाजिरवाणी आहे. राज्य व केंद्रात शेती विषयक धोरण ठरविणाऱ्या राजकीय आणि त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय यंत्रणांचे अपयश यातून अधोरेखित होते. राज्यात सन २०१० मध्ये ५४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यानंतर सन २०११ मध्ये सुमारे ४८५ तर यंदा ११८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब समोर आली. गेल्या तीन वर्षांत शेजारच्या आंध्र प्रदेशात सुमारे ४३१ शेतकऱ्यांनी तर कर्नाटकात गेल्या तीन वर्षांत १६२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतकरी आत्महत्यांच्या दृष्टचक्रात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या तीन राज्यांना सर्वाधिक फटका बसत असून महाराष्ट्र यात क्रमांक एकचे राज्य झाले आहे. शेतीसोबत जोडधंदा उभा करण्यासाठी या भागातील केवळ गरजू शेतकऱ्यांना मदत व प्रोत्साहित करण्याच्या योजना राबविणे आता अनिवार्य झाले आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या अजूनही चालूच आहेत. पाण्याची टंचाई तर राज्याच्या पाचवीलाच पुजलेली आहे. आजही महाराष्ट्रातील शेकडो गावं टॅंकरच्या पाण्यावर अवलंबून आहेत आणि अनेक छोट्या शहरांना आठवड्यातून एकदा पाणी मिळतं. पावसानं ओढ दिली, तर लोकांच्या तोंडचं पाणी पळतं. दुष्काळाचं सावट, ही तर आता नित्याचीच बाब बनली आहे. दर दोन–तीन वर्षांनंतर राज्यातील काही जिल्हे अवर्षणग्रस्त बनत असतात. महागाईला तर काही मर्यादाच उरलेली नाही.

या सगळ्या प्रश्नांवरील विद्यमान आणि इच्छुक दोन्ही प्रकारच्या सत्ताधाऱ्यांचे तोडगे जवळ जवळ सारखेच असतात. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या जर रोखायच्या असल्या, तर त्यांची कर्जे माफ करायला हवीत, असं सगळे जणच मानतात. सध्याच्या सत्ताधाऱ्यांच्या केंद्रातील पक्षांनी अशी 60 ते 70 हजार कोटींची कर्जे गेल्या वर्षी माफ केली होती. नंतर महाराष्ट्र सरकारनंही आणखी काही हजार कोटींची कर्जं माफ करून त्यात भर टाकली. आता निवडणुकीनंतर सत्तेत येऊ पाहणारे पक्ष आश्वासनं देत आहेत, की शेतकऱ्यांचा सात–बाराचा उतारा आम्ही ”कोरा करू’. त्यावर ”सात बारा कधी पाहिला आहे काय?’, असा प्रतिटोलाही सध्याच्या सत्ताधाऱ्यांकडून हाणला जात आहे. मात्र सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी केलेली उपाययोजना आणि इच्छुक सत्ताधाऱ्यांनी दिलेली आश्वासनं यावर शेतकऱ्यांचा फारसा विश्वास दिसत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालूच राहिल्या आहेतय फक्त प्रमाण कमी झालं आहे एवढंच. कारण शेतकऱ्याच्या आत्महत्यांचा संबंध हा शेती क्षेत्राच्या कुंठितावस्थेशी आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर जमतो, हे या कुंठितावस्थेचं लक्षण आहे. तो रोग नाही. पण सर्व राजकीय पक्षांना फक्त लक्षणं हा रोग समजून त्यावर उपाय करण्यातच रस आहे. मग त्यांना रोगाचं खरं स्वरूप माहीत नाही काय? असं मुळीच नाही. रोग काय आहे आणि तो किती जुनाट आहे, हे त्यांनाही माहीत आहे. त्यावर रामबाण उपाय योजण्याची गरजही त्यांना पटत असते. मात्र ते हा उपाय योजत नाहीतय कारण त्यासाठी हितसंबंध मोडण्याची आणि अनेक वर्षं डोळ्यांवर बांधून ठेवलेली वैचारिक झापडं दूर करून स्वच्छ नजरेनं बघण्याकरिता जी राजकीय धमक आवश्यक असते, ती दाखवण्याची भीती या मंडळींना वाटत असते. त्यांचं सारं राजकारण हे हितसंबंध जपण्यावरच चालत असतं. त्यामुळे त्यांचे हात बांधले गेलेले असतात.

**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –1, Feb - 2011**
**ISSN:- 2230-7850** Available online at www.lbp.world

भारतीय शेतीचं खरं दुखणं आहे, ते कमी उत्पादकतेचं आणि या तुटपुंज्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या प्रचंड मनुष्यबळाचं. हातात पडतं कमी आणि खायला तोंडं जास्त, अशी सर्वसाधारण शेतकऱ्याची स्थिती आहे. लागवडीखालील बहुसंख्य जमीन कोरडवाहू आहे. ती पावसावर अवलंबून असते आणि जगभर हवामानात जे बदल होत आहेत, त्यामुळे पावसाचं प्रमाण सर्वसाधारणतः तेच राहिलं, तरी त्याच्या पूर्वापारच्या नक्षत्राप्रमाणं पडण्याच्या वेळा आता त्याच राहिलेल्या नाहीत. साहजिकच पाऊस पुरेसा पडला, तरी खरीप व रबीच्या हंगामात तो पडेलच असं नाही. औद्योगिकीकरणाच्या ओघात शेतीकडे दुर्लक्ष करण्याची किंवा शेतीतील उत्पन्न औद्योगिकीकरणाला लागणाऱ्या भांडवलासाठी वापरणं, हे केवळ भारतातच नव्हे, तर जगातील इतर देशातंही चालत आलं आहे. ज्या देशांच्या वसाहती होत्या, त्यांनी तेथे हे केलं आणि सोव्हिएत युनियनसारख्या देशांनी आपल्याच शेतकऱ्यांना वेठीला बांधलं.

हे दुखणं इतकं जुनं आहे, की महात्मा फुले यांनी "शेतकऱ्यांचा आसूड'मध्ये त्याचं विदारक वर्णन केलं आहे. महात्मा गांधी यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरवातच बिहारमधील चंपारण्यातील निळीच्या शेतकऱ्यांच्या लढ्यापासून केली होती. आज या दोन माहात्म्यांची नावं पालुपदासारखी घेणारे सर्व राजकारणी शेतकऱ्यांच्या नावे नुसते नक्राश्रू ढाळत बसलेले आहेत. महात्मा गांधी हे चंपारण्यात जाऊन बसले आणि त्यांनी शेतकऱ्यांना साथ दिली. आज काळ बदलला आहे.

प्रश्न तोच असला, तरी त्याचं स्वरूप बदललं आहे. तेव्हा आज प्रश्न संघर्ष करण्याचा नसून, संवेदनशील असण्याचा आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही राजकीय पक्षाचा एक तरी नेता असा आहे काय, की जो विदर्भाच्या अमरावती इत्यादी भागांत जाऊन ठाण मांडून बसला आहे आणि शेतकऱ्याचं दुःख समजावून घेऊन, त्यावर फुंकर घालून, त्यांना समजावून व आधार देऊन जगण्याच्या संघर्षासाठी पुन्हा उभं राहण्यास त्याना हातभार लावत आहे

## संदर्भग्रंथ संची

1) दास्ताने संतोष 'महाराष्ट्र' 2004 दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे
2) देशमुख बी.टी.'महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष', क्ष–किरण परिक्षण, पिंपळापुरे पब्लिकेषन, पुणे
3) देशमुख प्रभाकर,'भारतीय शेती : स्थिती,स्वरूप आणि समस्या' विद्या प्रकाषन, पुणे
4) अकोला जिल्हा आर्थिक समालोचन
5) महाराष्ट्राची आर्थिक पाहीणी,